आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१४ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लष्करी, वाणिज्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातली भागिदारी बळकट करण्यावर भारत आणि अमेरिका यांच्यात सहमती

- राज्यातल्या सर्व पोलीस आयुक्तालयांमध्ये तीन नवीन गुन्हेगारी कायदे लवकरात लवकर लागू करण्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सूचना

- रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाची परवानगी न घेता तिकीट लावून होणाऱ्या कार्यक्रमांची चौकशी करण्याचे सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांचे आदेश

**आणि**

- शेअर बाजारात सलग आठव्या सत्रात घसरण, गुंतवणूकदारांचं २५ लाख कोटी रुपयांहून अधिक नुकसान

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यात लष्करी, वाणिज्य आणि तंत्रज्ञान क्षेत्रातली भागिदारी आणखी बळकट करण्यासाठी कॉपॅक्ट या नव्या उपक्रमावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीनंतर प्रसिद्ध झालेल्या संयुक्त निवेदनात याविषयी अधिक माहिती दिली आहे.

**होल्ड**

*संरक्षण भागीदारीसाठी नव्या दहा वर्षांच्या आराखड्यावर स्वाक्षरी केल्याची घोषणा भारत आणि अमेरिकेनं केली आहे. २०२५ ते २०३५ या दशकभरासाठी असणाऱ्या या आराखड्याचा हेतू दोन्ही देशातले संरक्षण संबंध दृढ करणं हा आहे.*

*अमेरिका भारतासोबतच्या संरक्षण सामुग्री विक्री आणि संयुक्त उत्पादनावर अधिक भर देईल, असं दोन्ही देशांच्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. तसंच राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि रोजगार निर्मितीसाठी भारत – अमेरिके दरम्यानचे व्यापारी संबंध अधिक दृढ केले जातील, असंही यात म्हटलं आहे. येत्या ५ वर्षात दोन्ही देशांतला व्यापार दुपटीहून अधिक वाढवून ५०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धारही यावेळी करण्यात आला आहे. तसंच सप्टेंबरपूर्वी दोन्ही देशांमधल्या व्यापार कराराच्या चर्चांचा पहिला टप्पा पूर्ण करण्यालाही प्राधान्य दिलं जाईल. भारताला नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलं पुरवठ्यासाठी अमेरिकेला आघाडीचा पुरवठादार करण्यावरही दोन्ही देशांनी प्रतिबद्धता व्यक्त केली. दहशतवाद समूळ नष्ट करण्यासाठी ठोस कृतीची गरज प्रधानमंत्री मोदी यांनी व्यक्त केली.*

***बाईट....***

*संरक्षण, AI, सेमीकंडक्टर, क्वांटम, जैवतंत्रज्ञान, ऊर्जा आणि अंतराळ क्षेत्रात दोन्ही देशातले शासकीय, शैक्षणिक आणि खासगी क्षेत्रातला द्विपक्षीय संवाद वाढवण्यासाठी TRUST उपक्रम सुरू करण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. अमेरिकी विद्यापीठांची केंद्र देशात सुरू करणं, भारत आणि अमेरिका यांच्या शैक्षणिक संस्थांचे संयुक्त अभ्यासक्रम सुरू करण्यावरही यावेळी सहमती झाली. मुक्त, शांत आणि समृद्ध हिंद - प्रशांत प्रदेशासाठी दोन्ही देशातली भागीदारी उपयुक्त ठरेल असं यावेळी सांगण्यात आलं.*

**<><><><><>**

राज्यातल्या सर्व पोलीस आयुक्तालयांमध्ये तीन नवीन गुन्हेगारी कायदे लवकरात लवकर लागू करण्याची सूचना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज केली. फौजदारी कायद्यांच्या राज्यात होत असलेल्या अंमलबजावणीबाबत घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. महाराष्ट्र सरकारने नवीन फौजदारी

कायद्यानुसार खटले चालवण्यासाठी स्वतंत्र संचालनालयाची स्थापना करावी, असे आदेश अमित शाह यांनी यावेळी दिले.

राज्यात तिन्ही कायद्यांची अंमलबजावणी अतिशय चांगल्या पद्धतीने सुरु असून, ९० टक्के पोलिस दलानं नवीन कायद्यांचं प्रशिक्षण घेतलं आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आरोपींना सुनावणीसाठी वारंवार न्यायालयात न्यावं लागू नये, यासाठी नवीन कायद्या अंतर्गत कारागृहात साक्ष घेऊन न्यायालयाशी ऑनलाईन माध्यमातून जोडली जाईल. त्यामुळे पोलीस वाहनं, आणि सुरक्षा व्यवस्थेवरचा ताण कमी होईल, आणि न्यायालयातली गर्दी कमी होईल असं त्यांनी सांगितलं. मुंबई दहशतवादी हल्ला प्रकरणातला आरोपी तहव्वूर राणा याच्या प्रत्यार्पणाला अमेरिकेनं होकार दिला असून, त्याच्या विरोधात मुंबईत खटला चालवण्यासाठी संबंधित यंत्रणा सज्ज असल्याचं त्यांनी सांगितलं. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्याच्या रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाची परवानगी न घेता तिकीट लावून होणाऱ्या आणि अश्लील भाष्य करणाऱ्या कार्यक्रमांची चौकशी करण्याचे आदेश राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशीष शेलार यांनी दिले आहेत. भारतीय डिजिटल पार्टी या ओटीटी वाहिनीच्या निर्लज्ज कांदेपोहे या कार्यक्रमाविरोधात अनेक तक्रारी शेलार यांच्याकडे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मंत्रालयात आज झालेल्या सांस्कृतिक विभागाच्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत चौकशी करण्याचे आदेश शेलार यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

मुंबईत बेस्ट बसचा प्रवास महागण्याची शक्यता आहे. बेस्टचे महाव्यवस्थापक एस. व्ही. आर. श्रीनिवासन यांनी काल अधिकाऱ्यांची बैठक घेतली

होती. बेस्टचा तोटा भरून काढण्यासाठी भाडेवाढ हा एकमेव उपाय असल्याने त्यावर विचार सुरू आहे. अद्याप याबाबत निर्णय झालेला नाही, अशी माहिती श्रीनिवासन यांनी दिली आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज सलग आठव्या सत्रात घसरण कायम राहिली. बाजार बंद होताना सेन्सेक्स २०० अंकांनी घसरला आणि ७५ हजार ९३९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १०२ अंकांनी घसरला आणि २२ हजार ९२९ अंकांवर बंद झाला.

तेल आणि वायू, फार्मा, सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका, बांधकाम, ग्राहकोपयोगी वस्तू, आणि ऊर्जा क्षेत्रासह सर्वच क्षेत्रांचे समभाग आज घसरणीच्या दबावाखाली राहिले.

शेअर बाजारातल्या गेल्या ८ सत्रांमधल्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांनी तब्बल २५ लाख ३१ हजार कोटी रुपयांची संपत्ती गमावली. या काळात सेन्सेक्समध्ये ३ टक्के, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीमध्ये ३ पूर्णांक ४१ शतांश टक्के घट नोंदवली गेली.

जागतिक व्यापार युद्धाच्या प्रभावामुळे परदेशी गुंतवणुकीचा ओघ आटेल, या भीतीमुळे गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्याचं बाजार विश्लेषकांनी सांगितलं.

**<><><><><>**

रिझर्व्ह बँकेनं आज मुंबईतल्या न्यू इंडिया सहकारी बँकेचं संचालक मंडळ बरखास्त केलं. प्रशासनाचा दर्जा खालावल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली. रिझर्व्ह बँकेनं न्यू इंडिया सहकारी बँकेवर काल विविध निर्बंध लागू केले होते. त्यानुसार बँकेला पुढले सहा महिने नवीन कर्ज देता येणार नाही तसंच बचत खातं, चालू खातं किंवा ठेवीदाराच्या इतर कुठल्याही खात्यातून रक्कम काढता येणार

नाही. स्टेट बँक ऑफ इंडियाचे माजी मुख्य महाव्यवस्थापक श्रीकांत, यांची बँकेच्या कारभाराचं व्यवस्थापन करण्यासाठी 'प्रशासक' म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, बँकेचं संचालक मंडळ १२ महिन्यांसाठी बरखास्त करण्यात आल्याचं रिझर्व्ह बँकेनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर बँकेच्या विविध शाखांमध्ये आज ग्राहकांनी मोठी गर्दी केली होती. बँकेच्या एकूण २८ शाखा असून, सर्व शाखा मुंबईत आहेत.

**<><><><><>**

इयत्ता १० वी आणि १२ वी उत्तीर्ण झालेल्या क्रीडानिपुण विद्यार्थ्यांना ग्रेस गुणांसाठीचे online अर्ज सादर करण्यासाठी १० मार्च, २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. हे अर्ज ‘आपले सरकार’ या पोर्टल च्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे पाठवावेत.

**<><><><><>**

कोल्हापूरच्या चंदगड इथं गुईलेन बॅरे सिंड्रोमग्रस्त महिला रुग्णाचा मृत्यू झाला आहे. या महिलेवर गेल्या काही दिवसांपासून छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात उपचार सुरू होते. या आजारामुळं राज्यात झालेला हा ९वा मृत्यू आहे. राज्यात गुईलेन बॅरे सिंड्रोमचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत.

**<><><><><>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटनेची बांधणी आणि पक्षाच्या महत्वाच्या धोरणांच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने कोअर ग्रुपची स्थापना केल्याचं प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, कार्याध्यक्ष प्रफुल पटेल राष्ट्रीय, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, छगन भुजबळ, दिलीप

वळसे पाटील, हसन मुश्रीफ आणि धनंजय मुंडे यांचा यात समावेश करण्यात आला आहे.

**<><><><><>**

उत्तराखंड इथे आयोजित ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा आज हलद्वानी इथे समारोप झाला. या समारोप समारंभाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी त्यांनी उत्तराखंडचं अभिनंदन केलं, तसंच ग्रीन गेम्स या उपक्रमाचं कौतुकही केलं. या समारंभात भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांनी या स्पर्धेच्या समारोपाची अधिकृत घोषणा केली. त्यानंतर अमित शहा यांनी मेघालयाचे मुख्यमंत्री कॉनराड संगमा यांना या स्पर्धेचा ध्वज सुपूर्द केला. ३९व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचं आयोजन मेघालयात होणार आहे.

या स्पर्धेत महाराष्ट्राने सर्वाधिक २०१ पदं पटकावली असून त्यात ५४ सुवर्ण, ७१ रौप्य आणि ७६ कांस्य पदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर असून सेना दलं ६८ सुवर्णपदकांसह पहिल्या तर हरयाणा ४८ सुवर्णपदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

**//<><><><><>//**